परदेशातल्या प्रियजनांना राहते घराच्या चवीची ओढ,
DTDC करेल तुमच्या प्रियजनांची दिवाळी गोड...
वर्षातल्या सर्वात मोठ्या सणाला घरापासून लांब असण्याचं दुःख आम्ही समजू शकतो...
तुमचे प्रियजन घरी येऊ शकत नसले म्हणून काय झाले? तुमच्या हातचे फराळ तर त्यांच्यापर्यंत आम्ही नक्कीच पोहोचवू शकतो. तेही अगदी माफक दरात...
आपल्या अखंड सेवेत, DTDC कुरियर, कळंब.
: अधिक माहितीसाठी संपर्क :
मो.९४०४५११५१८/८९८३८९७०८९
DTDC एक्सप्रेस कुरियर सर्व्हिसेस, कळंब
छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल, सुनील मार्केट, गाळा नं.२७, कळंब ४१३५०७

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, गुरुवार, दि.१७ ऑक्टोबर २०२४

वर्ष : ०४, अंक : ६४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

## देवेंद्र फडणवीस यांचं शरद पवारांना आव्हान...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, मुंबई :** आज महायुतीने पत्रकार परिषद घेऊन त्यांचं रिपोर्टकार्ड सादर केलं. एवढंच नाही तर आम्हाला महाराष्ट्राचा विकास करायचा आहे, खुर्ची हे आमचं लक्ष्य नाही असंही एकनाथ शिंदे म्हणाले. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शंखनाद या एका शब्दाने एक्स पोस्ट केली होती. राज्यात निवडणुकींचा शंखनाद झालाय, असं त्यांना म्हणायचं होतं. आजही महायुतीची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. आजच्या पत्रकार परिषदेला संबोधित करताना त्यांनी विरोधकांवर टीका केली. ते म्हणाले, निवडणुकीचा शंखनाद झालाय. अर्थात आमच्याकरता शंखनाद झाला आहे असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.



**लाडकी बहीण योजना बंद होणार नाही...**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विरोधक एकीकडे म्हणत आहेत की राज्याच्या तिजोरीत पैसे नाहीत आणि वर घोषणा करतात की त्यांचं सरकार आल्यावर ते संपूर्ण कर्जमाफी करणार आणि इतरही अनेक घोषणा करत आहेत. त्यामुळे विरोधकांनी आधी ठरवावं की सरकारकडे योजनांसाठी पैसे आहेत की नाहीत? पैसे असतील तर ते पुढची कर्जमाफी करू शकतील. मात्र, आम्ही ज्या योजना आतायँत सांगितल्या आहेत, त्या पूर्ण विचार करून जाहीर केल्या आहेत. त्या योजना यापुढेही चालू राहतील. प्रत्येक योजनेच्या पाठिशी पूर्ण आर्थिक पाठबळ उभं करूनच आम्ही योजना जाहीर करू. मात्र विरोधक गोंधळले आहेत. त्यामुळे लाडकी बहीण योजना बंद करावी असं त्यांना वाटतं. परंतु, मला एक गोष्ट सर्वांना सांगायची आहे की या निमित्ताने महाविकास आघीचा पर्दाफाश झाला आहे, तसंच लाडकी बहीण योजना कायमस्वरुपी असणार आहे असंही देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलं.

**शरद पवार यांना आव्हान**

महायुतीचं रिपोर्ट कार्ड सादर करण्यात आल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट शरद पवारांना आव्हान दिलं आहे. फडणवीस म्हणाले, सत्ता पक्षाला कुठलीही चिंता नाही. मुख्यमंत्री स्वतःच इथे आमच्याबरोबर बसले आहेत. त्यांना विचारा तुमचा चेहरा कोण. माझं शरद पवारांना खुलं आव्हान आहे शरद पवारांनी तुमचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण ते सांगा? असं आव्हान देवेंद्र फडणवीस यांनी दिलं. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना टोला लगावला.

**एकनाथ शिंदे काय म्हणाले?**

देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिल्यानंतर एकनाथ शिंदे म्हणाले, आमच्याकडे कुणालाही मुख्यमंत्री होण्याचे डोहाळे लागलेले नाहीत. आमचं काम हाच आमचा चेहरा आहे. महाविकास आघाडीने आता विरोधी पक्षनेत्याचा चेहरा ठरवावा. असा टोला एकनाथ शिंदेंनी लगावला. जागावाटप पूर्ण झालं की आम्ही तुम्हाला माहिती देऊ. आम्ही अगदी अंतिम टप्प्यावर आहोत. या सगळ्यात आम्ही साधारणपणे कुठल्या पक्षाचा कुठे जोर आहे? तीन पक्ष मिळून कुठे जिंकता येईल? या सगळ्या गोष्टी सांगू. फॉर्म्युला असा मध्येच सांगता येणार नाही. सगळं ठरलं की आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

## अमरावतीत युवकाची हत्या अन् संतप्त नागरिकांचा पोलीस ठाण्यासमोर ठिय्या

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, अमरावती :** अमरावती शहरात हत्येचे सत्र सुरूच आहे. अमरावतीच्या चित्रा चौकात मंगळवारी रात्री उशिरा एका तरुणाची हत्या करण्यात आली. क्षुल्लक वादातून चाकूने पोटात वार करून ही हत्या करण्यात आली आहे. गोलू सुनील उसरेटे (वय ३० वर्षे) असे मृत तरुणाचे नाव आहे. गोलू हा अमरावतीच्या रतनगंज येथील रहिवासी होता.



या घटनेमुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी बुधवारी दुपारी आमदार रवी राणा यांच्या निवासस्थानी धाव घेतली. त्यानंतर नागरिकांनी शहर कोतवाली पोलीस ठाण्यात पोहचून ठिय्या आंदोलन सुरू केले. या ठिकाणी आमदार रवी राणा, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांच्यासह विविध राजकीय पक्षाचे नेते पोहचले आहेत. आरोपींवर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

गोलू हा रात्री दहा वाजताच्या सुमारास चित्रा चौकात मित्रांसोबत फिरायला गेला होता. यावेळी चौकात चार तरुणांसोबत क्षुल्लक कारणावरून त्याचा वाद झाला. यावेळी चौघांनी चाकूने हल्ला केल्याने गोलूने पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र गोलूचा पाठलाग करीत आरोपींनी त्याच्यावर चाकूने वार केले. रक्तबंबाळ अवस्थेत गोलूला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले, पण डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. गेल्या दहा दिवसांत शहरात हत्येच्या सहा घटना घडल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. बुधवारी दुपारी रतनगंज परिसरातील नागरिकांनी आमदार रवी राणा यांच्या निवाससथानी धाव घेतली. आरोपींना फाशी द्या, अशी मागणी नागरिकांनी केली. रवी राणा यांनी नागरिकांसोबत चर्चा केली. गोलू हा एक सामाजिक कार्यकर्ता होता. त्याने कावड यात्रा देखील काढली होती. त्याच्या हत्येची घटना दुर्देवी आहे. गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक राहिलेला नाही. आपण पोलिसांच्या विरोधात रस्त्यावर उतरू, असा इशारा रवी राणा यांनी दिला.

त्यानंतर, संतप्त नागरिक शहर कोतवाली पोलीस ठाण्यासमोर पोहचले. तेथे त्यांनी ठिय्या आंदोलन सुरू केले. दरम्यान, शहरातील वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर खासदार बळवंत वानखडे, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, माजी महापौर विलास इंगोले, काँग्रेसचे शहराध्यक्ष बबलू शेखावत यांनी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांची भेट घेऊन गुन्हेगारीला आळा घालण्याची मागणी त्यांच्याकडे केली. शेकडो नागरिकांनी पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले असून आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी त्यांची मागणी आहे.

## राज्य प्रकल्प व्यवस्थापनाची भूजल केंद्रास भेट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, अमरावती :** अटल भूजल योजनेंर्तगत माहिती शिक्षण व संवाद घटकांतर्गत भूजल माहिती प्रसारण केंद्राला राज्य व्यवस्थापन कक्षातील जलसंधारण तज्ज्ञ रमेश पेटकर यांनी भेट दिली.

अटल भूजल योजनेंतर्गत माहिती शिक्षण व संवाद घटकांतर्गत मोर्शी आणि वरुड तालुक्यातील योजनेत समाविष्ट ग्रामपंचायतीमध्ये भूजल माहिती प्रसारण केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्रास पुणे येथील राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचे जलसंधारण तज्ज्ञ रमेश पेटकर यांनी जिल्ह्यातील लेहगाव, ता. मोर्शी आणि धनोडी, ता. वरुड येथील केंद्रास भेट देऊन तपासणी केली. यावेळी जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील माहिती शिक्षण संवाद तज्ज्ञ प्रमोद झगेकर उपस्थित होते.

रमेश पेटकर यांनी ग्रामस्थांना भूजल केंद्राचा उद्देश समजावून सांगितला. यावेळी त्यांनी भूजलाच्या शाश्वत विकासासाठी ग्रामपातळीवर सक्षम संस्थात्मक व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. याची म ुलभूत माहिती असणे आवश्यक आहे. ग्राम पंचायत पातळीवर एक स्वतंत्र व्यासपीठाची आवश्यकता असून त्यास चालना देण्यासाठी भूजल माहिती प्रसारण केंद्र चांगले माध्यम आहे.

अटल जल योजनेंतर्गत भूजल यासंबंधीची माहिती व अहवाल सर्वसाम ान्यांना खुली करण्यात आली आहे, याचा उपयोग होत असल्याचे सांगितले.प्रमोद झगेकर यांनी नैसर्गिक शेतीचा व कमी खर्चाच्या शेतीचा विचार शेतकऱ्यांनी करणे गरजेच असल्याचे मत व्यक्त केले. नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य बाजारपेठ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्याबाबत मार्गदर्शन केले. धनोडीचे सरपंच श्री. आंडे अध्यक्षस्थानी होते. कमलेश अजमिरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी शरद गोरे, भूपेश बावनकुडे, आशिष गाडबैल, अंकुश पेठ, योगेश यावले, रितेश माटे, विकास सुरोसे आदी उपस्थित होते.

## पोलीस कारवाईची भीती दाखवून तरुणाची २३ लाखांची फसवणूक

**दि.१६, पुणे :** काळ्या पैसा व्यवहारात दिल्ली पोलिसांकडून कारवाई करण्यात येणार असल्याची भीती दाखवून सायबर चोरट्यांनी तरुणाची २३ लाख ५५ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध चंदननगर पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका तरुणाने चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सायबर चोरट्यांनी तक्रारदार तरुणाच्या मोबाइल क्रमांकावर २१ सप्टेंबर रोजी संपर्क साधला होता. तुमच्याविरुद्ध दिल्ली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. बँक खात्याचा काळा पैसा व्यवहारात वापर झाला असून, या गुन्ह्यात अटक टाळण्यासाठी तातडीने पैसे जमा करावे लागतील, अशी भीती चोरट्यांनी तरुणाला दाखविली. त्यानंतर तरुणाला बँक खात्यात तातडीने पैसे जमा करण्यास सांगितले. त्याननंतर तरुणाने चोरट्यांनी दिलेल्या वेगवेगळ्या बँक खात्यात वेळोवेळी पैसे जमा केले. २३ लाख ५५ हजार रुपये जमा केल्यानंतर तरुणाच्या मोबाइलवर चोरट्यांनी पुन्हा संपर्क साधला. त्याला आणखी रक्कम जमा करण्यास सांगितले. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर तरुणाने पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल माने तपास करत आहेत.

**गुंतवणुकीच्या आमिषाने १४ लाखांची फसवणूक**

शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी एकाची १४ लाख रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी हडपसर पोलिसांनी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एकाने पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. तक्रारदार हडपसर भागात राहायला आहेत. त्यांच्या मोबाइल क्रमांकावर चोरट्यांनी १८ जून रोजी संपर्क साधला होता. एसबीआय सिक्युरिटीज कंपनीतून बोलत असल्याची बतावणी चोरट्यांनी केली. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखवून चोरट्यांनी त्यांना जाळ्यात ओढले. त्यानंतर वेळोवेळी १४ लाख ३० हजार रुपये घेतले. बँक खात्यात पैसे जमा केल्यानंतर त्यांना परतावा देण्यात आला नाही. चोरट्यांनी त्यांचे मोबाइल क्रमांक बंद केल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस निरीक्षक अमर काळंगे तपास करत आहेत.

## पंढरपुरात मराठा भवन उभारणीसाठी मिळाले आणखी १० कोटी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१६, पंढरपूर :** पंढरपुरात मराठा भवन बांधण्यात यावे, अशी मागणी पुढे आली. या मागणीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिरवा कंदील दाखवला. तात्काळ पाच कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली. मागील आषाढी यात्रेच्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पंढरीत आले होते. यावेळी त्यांनी आणखी दहा कोटी रुपयांचा निधी या वास्तूच्या बांधकामासाठी देण्याचे वचन दिले होते.हे वचन त्यांनी, पूर्णत्वास नेले आहे. या निधीच्या मंजुरीचा शासन निर्णय त्यांनी काढला आहे.



मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे येथील मराठा बांधवांनी मराठा भवन बांधण्याची मागणी केली होती. यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आषाढी एकादशीसाठी आले असता, या मराठा भवनाच्या बांधकामाचा शुभारंभ केला होता. या बांधकामासाठी पाच कोटी रुपयांचा निधी देण्यात आला होता. यासाठी आणखी निधी कमी पडल्यास तोही देण्यात येईल, असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आषाढी यात्रेदरम्यान पंढरपूरकरांना दिलेला शब्द पाळला आहे. मराठा भवन या वास्तूसाठी आणखी दहा कोटी रुपयांचा निधी सरकारच्या मावळत्या कार्यकाळात मंजूर केला आहे. याबाबतचे पत्र मुख्यमंत्री यांचे ओएसडी यांनी दिले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ही पंढरपूरकरांसाठी अनोखी भेट असल्याची प्रतिक्रिया पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात व्यक्त केली जात आहे.

## निवडणूकीच्या अनुषंगाने विविध आदेश जारी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, अकोला :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात पाचहून अधिक व्यक्तींना प्रवेश करता येणार नाही. जिल्हा दंडाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी अजित कुंभार यांनी याबाबतचा आदेश निर्गमित केले आहे. उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात, तसेच दालनात केवळ पाचहून अधिक व्यक्तींना प्रवेश दिला जाणार नाही. तसेच वाहनांच्या ताफ्यामध्ये तीनपेक्षा अधिक वाहने असू नयेत. कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्ये वाजविणे, गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे.

**वाहतुकीला अडथळा नको –**

निवडणूकीचे पोस्टर्स, बॅनर्स, कटआऊटस्, होर्डिंग्ज आदी साहित्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर रहदारीस अडथळा किंवा अपघात होईल असे लावण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. झेंड्याच्या काठ्या उभारणे, कापडी फलक लावणे, भित्तीपत्रके लावणे, घोषणा लिहिणे यासाठी कोणतीही खासगी जागा, इमारत, आवार, भिंतीचा वापर करण्याबाबत संबंधित जागामालक व संबंधित परवाना प्राधिकरणाची मान्यता घेणे बंधनकारक आहे.

**ध्वनीक्षेपक वापराबाबत मर्यादा –**

ध्वनीक्षेपकाचा वापर पोलीस अधिका–यांच्या परवानगीशिवाय करता येणार नाही. सकाळी ६ वा. वाजण्यापूर्वी व रात्री १० वा. नंतर वाहनावर किंवा कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपक वापरता येणार नाही. प्रचार वाहनांनी ध्वनीक्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबून करावा. ध्वनीक्षेपकाचा आवाजासह वाहन फिरते ठेवण्यास प्रतिबंध आहे.

**फिरत्या प्रचार वाहनाबाबत सूचना –**

फिरत्या वाहनावर पक्ष प्रचाराचा झेंडा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रीन ग्लासपुढे राहणार नाही व वाहनाच्या टपापासून २ फूटाहून उंच असू नये. प्रचार वाहनावर कापडी फलक वाहनचालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूने लावावा. इतरत्र लावू नये. वाहनावर पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनाव्यतिरिक्त इतर वाहनावर लावू नये. तसे आदेश जिल्हाधिका–यांनी निर्गमित केले आहेत.

## मोसमी पावसाची देशातून माघार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, मुंबई :** महाराष्ट्रासह संपूर्ण देशातून मोसमी पाऊस यंदा अपेक्षित वेळेत परतला आहे. मोसमी पावसाने मंगळवारी (१५ ऑक्टोबर) देशातून पूर्णपणे माघार घेतली असून, दक्षिण भारतात ईशान्य मोसमी पाऊस सक्रीय झाला आहे. यंदा दरवर्षीपेक्षा एक दिवस आधी, ३० मे रोजी केरळमध्ये मोसमी पाऊस दाखल झाला होता.

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यंदा नियोजित वेळेपेक्षा सात दिवस उशिरा २३ सप्टेंबर रोजी मोसमी पावसाचा परतीचा प्रवास दक्षिण राजस्थान आणि गुजरातच्या कच्छमधून सुरू झाला. दोन ऑक्टोबरपर्यंत गुजरात, राजस्थानच्या बहुतांश भागासह लेह, लडाख, जम्मू आणि काश्मीर, पंजाब, हरियाना, दिल्ली, हिमाचल प्रदेशातून मोसमी पाऊस माघारी फिरला होता. पाच ऑक्टोबरपर्यंत महाराष्ट्रातील नंदूरबार जिल्ह्याच्या उत्तर भागातून परतीचा प्रवास सुरू झाला होता.

ईशान्य भारतासह उत्तराखंड, बिहार, ओदिशा, पश्चिम बंगाल, झारखंडच्या काही भागातून १३ ऑक्टोबरपर्यंत मोसमी पाऊस माघारी परतला तर मंगळवारी (१५ ऑक्टोबर) महाराष्ट्रासह संपूर्ण देशातून मोसमी पाऊस परतला आहे. यंदा दरवर्षी सहा दिवस अगोदरच दोन जुलै रोजी मोसमी वाऱ्यांनी सर्व देश व्यापला होता.

# संपादकीय



## भारत न्यूझीलंडलाही क्लीन स्वीप देणार ?

बांगलादेशला कसोटी आणि टी २० मालिकेत क्लीन स्वीप दिल्यानंतर भारतीय क्रिकेट संघ आता न्यूझीलंडशी दोन हात करण्यास सज्ज झाला आहे. न्युझीलंड संघ भारत दौऱ्यावर आला असून या दौऱ्यात भारत - न्युझीलंड यांच्यात तीन कसोटी सामन्याची मालिका खेळणार होणार असून या मालिकेतील पहिला कसोटी सामना कालपासून म्हणजे १६ तारखेपासून सुरू झाला आहे. भारतासाठी ही खूप महत्वाची मालिका आहे कारण या मालिकेत विजयी मिळवून भारत विश्व कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीतील आपले स्थान नक्की करणार आहे. या मालिकेत जर भारताने विजय मिळवला तर सलग तीन वर्ष विश्व कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फरीत प्रवेश मिळवणारा भारत हा पहिला संघ ठरेल अर्थात भारत ही कसोटी मालिका जिंकणार यात कोणालाही शंका नाही प्रश्न आहे तो फक्त भारत न्यूझीलंडला बांगलादेश प्रमाणेच क्लीन स्वीप देणार का ? इतकाच. अर्थात भारताचा सध्याचा फॉर्म पाहता भारत या मालिकेत न्यूझीलंडला क्लीन स्वीप देत ३ - ० ने नमवेल अशीच चिन्हे दिसत आहे. भारत आज विश्व चॅम्पियनशिपच्या पदक तालिकेत पहिल्या क्रमांकावर आहे. भारतीय संघ सध्या तुफान फॉर्मात आहे. भारताचे सर्वच फलंदाज आणि गोलंदाज आज फॉर्मात आहे. भारताची फलंदाजी तर जगातील अव्वल फलंदाजी असून जगातील सर्वात धोकेदायक फलंदाज भारतात आहे. भारताचा कर्णधार आणि सलामीवीर रोहित शर्मा तसेच माजी कर्णधार विराट कोहली हे जगातील सर्वोत्तम फलंदाज समजले जातात यासोबतच भारताकडे यशस्वी जयस्वाल आणि शुभमन गिल हे युवा फलंदाज असून ते त्यांच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये आहे. अतिशय कमी कालावधीत या दोन्ही धडाकेबाज फलंदाजांनी अनेक विक्रम करत खोऱ्याने धावा केल्या आहेत. विकेट किपर ऋषभ पंत हा देखील असाच एक धडाकेबाज फलंदाज भारताकडे आहे. जीवघेण्या अपघातातून सावरलेला ऋषभ पंत हा जगातील सर्वात आक्रमक फलंदाज मानला जातो. आपल्या आक्रमक खेळीने सामना भारताकडे वळवण्याची ताकद त्याच्याकडे आहे. के एल राहुल हा संयमी फलंदाज मधल्या फळीचा कणा आहे. आक्रमक आणि संयमी अशा दोन्ही प्रकारच्या खेळी तो करू शकतो त्यामुळेच ही जगातील सर्वोत्तम फलंदाजांची फळी म्हणून भारताच्या फलंदाजीकडे पाहिले जाते. रविचंद्रन आश्विन आणि रवींद्र जडेजा हे भारताचे सर्वोत्तम फिरकीपटू आता केवळ फिरकीपटू नसून ते आता अष्टपैलू बनले आहेत. हे दोघे केवळ बॉलनेच नव्हे तर बॅटनेही कमाल करू शकतात हे आपण बांगलादेश विरुद्धच्या मालिकेत पाहिले आहे. त्यांच्या गोलंदाजीवर तर न बोललेलेच बरे. कसोटी मधील सर्वोत्तम फिरकी जोडी अशी त्यांची ओळख असून दोघानी मिळून ८५० च्या वर बळी घेतले आहेत. जसप्रीत बुमरा हा जगातील सर्वोत्तम वेगवान गोलंदाज भारताकडे आहे. हा गोलंदाज भल्या भल्या फलंदाजांची दांडी गुल करण्यात माहीर आहे. त्याला मोहंमद सिराज आणि नवोदित आकाश दीप यांची साथ मिळते त्यामुळे भारताचा हा संघ जगातील सर्वोत्तम संघ मानला जात आहे. अक्षर पटेल आणि कुलदीप यादव यासारखे गोलंदाज पॅव्हेलियनमध्ये बसतात यावरून भारतीय संघात किती ताकद दिसून येते. एकीकडे भारतीय संघ भक्कम दिसत असताना न्युझीलंड संघाने मात्र त्यांचा फॉर्म गमावला आहे. श्रीलंकेने त्यांचा नुकताच पराभव केला आहे. गेल्या काही दिवसात या संघाने उल्लेखनीय असा खेळ केलेला नाही. भारतातही या संघाची कामगिरी निराशाजनक आहे. भारतात विजय मिळवून या संघाला कैक वर्ष उलटली आहेत. मागील अनेक वर्षात हा संघ भारतात विजय मिळवू शकला नाही त्यामुळे भारतीय संघ न्यूझीलंडला देखील ३ - ० असा क्लीन स्वीप देऊन विश्व कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत प्रवेश निश्चित करेल यात शंका नाही. भारतीय संघ घरच्या मैदानावर दादा संघ आहे . घरच्या मैदानावर मागील १८ मालिका भारताने जिंकल्या आहेत यावरून भारताच्या ताकदीची कल्पना आहे. न्युझीलंड विरुद्ध विजय मिळवून भारतीय संघ ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडलाही इशारा देऊ शकतो कारण या मालिकेनंतर भारताला ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड या तुल्यबळ प्रतिस्पर्धी संघाशी लढायचे आहे शिवाय विश्व कसोटी चॅम्पियनशीपच्या अंतिम फेरीतही विजय मिळवायचा आहे त्याची पायाभरणी भारत या मालिकेतून करेल यात शंका नाही. भारतीय संघाला मनापासून शुभेच्छा!

# हात केव्हा केव्हा आणि का धुवावे ?

कोरोनाची साथ पसरत असताना याला प्रतिबंध घालण्यासाठी जागतिक आरोग्य संघटना आणि सरकारी आरोग्य विभागाकडून मुख्य उपाय सांगितला जात आहे. तो म्हणजे वारंवार हात धुवा, तेही शास्त्रशुद्ध पद्धतीने. हात धुण्याबाबत काही महत्वाच्या गोष्टी जागतिक सर्वेक्षणातून लक्षात आल्या आहेत. रिस्क अॅनॅलिसिस या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या नियत कालिकाच्या दि.२३ डिसेंबर २०१९च्या अंकात त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यानुसार ३० टक्के व्यक्ती शौचास जाऊन आल्यावर अजिबात हात धुत नाहीत. ज्या ७० टक्के व्यक्ती हात धुतात, त्यातले निम्मे लोक केवळ पाण्याने हात ओले करतात आणि पुसतात. केवळ २ टक्के व्यक्तीच शास्त्रशुध्द पद्धतीने हात धुतात. त्यामुळे जागतिक आरोग्य संघटना व युनिसेफ जगभरात हात कसे धुवावेत, याचे प्रशिक्षण शालेय विद्यार्थ्यांना देण्यावर भर देत आहेत.



या बाबतच्या जनजागृतीसाठी दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी जागतिक हात धुवा दिवस साजरा केला जातो. सुरुवातीला केवळ विद्यार्थ्यांपर्यंत मर्यादित असणाऱ्या या विषयाला कोविड-१९ मुळे एवढे महत्व आले, कि आता जीव वाचवण्यासाठी हात धुवा, असे म्हणण्याची वेळ जागतिक आरोग्य संघटनेवर आली आहे. या माहिती अधिकार कायद्याचा दुरुपयोग करणाऱ्यांची तक्रार करावी. अंगणवाडी व शाळेतील लहान मुलांमध्ये हात धुण्याचे संस्कार रुजविण्यासाठी गावातील अंगणवाडीताई व आशा वर्कर यांनी गीताच्या माध्यमातून मुलांमध्ये हात धुण्याच्या प्रक्रियेत एक गोडी निर्माण केली पाहिजे. सकाळी प्रार्थनेच्या वेळी लहान मुले हे गीत गाऊन स्टेप बाय स्टेप सामुहिक हात धुण्याचा उपक्रम घेतील. तेव्हा घराघरात हात धुण्याचा संदेश पोहोचवावा. हात धुण्याची महत्वाची कृती ही कायम व्यवस्थित व्हावी. हात कधी धुवावे? स्वयंपाकापूर्वी, जेवण्यापूर्वी व जेवल्यावरसुद्धा, कोणत्याही आजारी व्यक्तीला भेटण्यापूर्वी, त्यांना स्पर्श करण्यापूर्वी व नंतरही, कुठल्याही जखमेला हात लावण्यापूर्वी आणि नंतरही, शौचाला व लघुशंकेला जाऊन आल्यानंतर, लहान बाळाची शी धुतल्यानंतर, बाळाचे डायपर, लंगोट बदलल्यानंतर, नाक शिंकरल्यावर, शिंक आल्यानंतर, प्राण्यांना खाऊ घातल्यावर, त्यांची विष्ठा साफ केल्यावर, प्राण्यांना कुरवाळल्यावर किंवा हाताळल्यानंतर. घर झाडून-पुसून घेतल्यावर, कचरा टाकल्यानंतर किमान चाळीस सेकंद हात साबणाने स्वच्छ धुवावे. हातांची नियमित स्वच्छता राखल्यास कोरोना किंवा इतर संसर्गजन्य रोग पसरणारच नाहीत का? अशी शंका अनेकांच्या मनात असेल. खरेतर कुठल्याही रोगाचा १०० टक्के प्रतिबंध शक्य नाही. परंतु काही मूलभूत स्वच्छता पाळल्यास रोगाचा प्रसार नक्की रोखला जातो. म्हणूनच सामाजिक व वैयक्तिक आरोग्याच्या दृष्टीकोणातून हातांची स्वच्छता हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. व्यवस्थित हात धुण्याची सवय ही खरे तर कायमस्वरूपीच हवी. परंतु तसे होत नसल्याने दरवर्षी १५ ऑक्टोबर हा जागतिक हात धुवा दिवस म्हणून पाळला जातो. जागतिक आरोग्य संघटना, युनिसेफ व स्वच्छ भारत अभियान याबाबत मोठ्या प्रमाणात जाणीव जागृती करीत आहेत. हात धुण्याची सवय लोकांच्या अंगवळणी पडावी, हाच हेतू आहे.

हात धुण्याचा महत्वाचा शोध व इतिहास असा- इ.स.१८४०मध्ये डॉ.ईगनाज, सेमेलवाईस यांनी हात धुण्याचा महत्वाचा शोध लावला. युरोपमध्ये एका शैक्षणीक इस्पितळात ते डॉक्टर होते. दवाखाण्यात बाळांतपणासाठी येणाऱ्या महिलांचा मोठ्या प्रमाणात मृत्यू होत असे. एका प्रयोगामध्ये त्यांनी सर्व वैद्यकीय विद्यार्थ्यांना व इतर डॉक्टरांना गरोदरमातेस हात लावण्यापूर्वी स्वच्छ हात धुण्यास सांगितले. केवळ या हात धुण्यामुळे प्रसूती विभागातील मृत्यू जवळजवळ ५० टक्क्यांनी कमी झाले. अशा रितीने हात धुण्याचा महत्वाचा शोध लागला. जे लोक नियमित हात स्वच्छ ठेवतात, त्यांचे आरोग्य नेहमीच चांगले राहते. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्यामुळे त्यांच्यामार्फत घराघरात हात धुण्याचा व स्वच्छतेचा संदेश देण्यात येत आहे. स्वच्छतेच्या सवयी शाळेतून लागाव्यात यासाठी मुलां-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय करण्यात आली आहे. ते स्वच्छ व वापरात राहण्यासाठी शाळेसह गावकऱ्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. हात धुण्यासाठी शाळा व गावपातळीवर मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात यावी. पुष्कळ लोकांना हात कसे धुवावे हे माहितीच नाही.

**हात धुण्याच्या योग्य पद्धतीचे पाच टप्पे-** १) सुरुवातीला पाण्याने हात ओले करावे व त्यानंतर हाताला साबण लावावी. २) हाताचे तळवे एकमेकांवर घासावे. ३) बोटे एकमेकांत अडकवून ती एकमेकांवर घासावी. ४) उजव्या हाताच्या बोटांची टोके डाव्या हाताच्या तळव्यावर गोल फिरवून घासावी आणि त्यानंतर तीच क्रिया दुसऱ्या हाताने करावी म्हणजे नखे स्वच्छ होतील. ५) पाणी वापरून हात खळवळून घ्यावेत. या पाच टप्प्याद्वारे हाताची स्वच्छता करणे गरजेचे आहे. याचे प्रात्यक्षिक प्रत्येक शाळेतून दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी करण्यात आले पाहिजेत. जिल्ह्यातील सर्व ग्राम पंचायती, शाळा, महाविद्यालय, अंगणवाड्या यांमधून कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले पाहिजेत. हात धुण्याच्या प्रात्यक्षीकातून लोकांना हात धुण्याची सवय लागेल. शालेय विद्यार्थ्यांमार्फत घरातील सर्व सदस्यापर्यंत हा संदेश जाणार आहे. या संदेशाचा सर्वस्तरातून वापर झाला तर सर्वांचे हात स्वच्छ राहतील. परिणामी रोगराईस आळा बसेल, यात शंकाच नाही!

**!! यानिमित्ताने सर्वांना हात स्वच्छ धुण्यासाठी प्रेरणादायी हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

- संकलन व सुलेखन -

**श्री.कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**गडचिरोली, फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.**

# साधी राहणी, सोज्वळ स्वभाव असा दानवीर : रतन टाटा

रतन टाटा हे एक भारतीय उद्योगपती आणि टाटा सन्सचे माजी अध्यक्ष होते. १९९० ते २०१२ या काळात ते टाटा समूहाचे अध्यक्ष होते आणि ऑक्टोबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीत ते समूहाचे अंतरिम अध्यक्ष होते, तसेच त्यांच्या चॅरिटेबल ट्रस्टचे नेतृत्व करीत होते. ते पद्मविभूषण आणि पद्मभूषण या भारतातील दोन सर्वोच्च नागरी पुरस्कारांचे प्राप्तकर्ते आहेत. रतन टाटा यांना २००० मध्ये पद्मभूषण आणि २००८ मध्ये पद्मविभूषण, भारत सरकारचा तिसरा आणि दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला. टाटा यांना २००६ मध्ये महाराष्ट्रातील सार्वजनिक प्रशासनातील त्यांच्या कामासाठी 'महाराष्ट्र भूषण' आणि आसाममध्ये कर्करोगाच्या उपचारात योगदान दिल्याबद्दल २०२१ मध्ये 'आसाम वैभव' असे विविध राज्य नागरी सन्मानही मिळाले आहेत.

त्यांचा जन्म २८ डिसेंबर १९३७ रोजी ब्रिटिश राजवटीत मुंबई येथे झाला होता. 'रतन' हे नवल टाटा यांचे पुत्र आणि टाटा कुटुंबातील वंशज हाते, ज्यांना नंतर टाटा समूहाचे संस्थापक जमशेटजी टाटा यांचे पुत्र रतनजी टाटा यांनी दत्तक घेतले होते. टाटा समूहाचे संस्थापक जमशेदजी टाटा यांच्या भाची सूनी टाटा या त्यांच्या आई होत. टाटांचे आजोबा होर्मुसजी टाटा हे रक्ताने टाटा कुटुंबाचे सदस्य होते. १९४८ मध्ये टाटा १० वर्षांचे असतांना, त्यांचे आई-वडील विभक्त झाले तेव्हा आणि त्यानंतर त्यांचे संगोपन केले आणि रतनजी टाटा यांच्या आजी आणि विधवा नवजबाई टाटा यांनी त्यांना दत्तक घेतले. त्यांना एक धाकटा भाऊ (जिम्मी टाटा) आहे आणि नोएल टाटा हे सावत्र भाऊ आहेत, जे त्यांच्या वडिलांच्या दुसऱ्या पत्नी सिमोन टाटा यांचे पुत्र आहेत. टाटा यांनी कधीही लग्न केले नाही आणि त्यांना मूलबाळ नव्हते. २०११ मध्ये त्यांनी सांगितले की, मी चार वेळा लग्न करण्याच्या जवळ आलो आणि प्रत्येक वेळी मी भीतीने किंवा एका कारणास्तव मागे हटलो.

मुंबईच्या कॅम्पियन स्कूलमध्ये त्यांनी आठवीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी मुंबईतील कॅथेड्रल आणि जॉन कॉनन स्कूल, शिमला येथील बिशप कॉटन स्कूलमध्ये शिक्षण घेतले. नंतर त्यांनी १९५५ मध्ये न्यूयॉर्क येथील रिव्हरडेल कंट्री स्कूलमध्ये पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पदवी घेतल्यानंतर टाटा यांनी कॉर्नेल विद्यापीठात प्रवेश घेतला, ज्यामधून त्यांनी १९५९ साली वास्तुशास्त्र मध्ये पदवी प्राप्त केली. कॉर्नेल युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि हार्वर्ड बिझनेस स्कूलचे व्यवस्थापन कार्यक्रमाचे ते माजी विद्यार्थी होते. १९७५ मध्ये त्यांनी हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या सात-आठवड्याच्या प्रगत व्यवस्थापन कार्यक्रमात भाग घेतला. कॉर्नेलमध्ये असतांना टाटा अल्फा सिग्मा फी फ्रेटरनिटीचे सदस्य बनले. त्यानंतर ते त्यांच्या कंपनीत रुजू झाले. तेव्हा ते टाटा स्टीलच्या शॉप फ्लोअरवर काम करायचे. टाटा समूहाचे संस्थापक असलेल्या जमशेदजी टाटांचा नातू अशा पद्धतीने धडपड करतो आहे हे पाहून जे.आर. डी. प्रभावित झाले. आजीची तब्येत बिघडल्यामुळे तिला भेटायला भारतात आलेल्या रतन यांना जे.आर. डी. यांनी टाटा उद्योग समूहामध्ये येण्याचे निमंत्रण दिले. १९६२ च्या डिसेंबर महिन्यात रतन टाटा समूहात दाखल झाले, मात्र समूहाच्या परंपरेनुसार ६२ ते ७१ त्यांना विविध कंपन्यांमध्ये काम करण्यास सांगण्यात आले. जमशेदपूरच्या टाटा स्टीलमध्ये अगदी कोळसा उचलण्यापासून ते भट्टीपाशी काम करण्यापर्यंतचे सर्व अनुभव घेतल्यानंतरच १९७१ मध्ये त्यांच्याकडे टाटा समूहातील नेल्को या कंपनीची धुरा सोपविण्यात आली. नेल्को ही त्यावेळी तोट्यात चालणारी कंपनी होती. रेडिओ आणि टेलिव्हिजनचे उत्पादन करणारी ही कंपनी पुढील तीन वर्षांमध्ये स्वतःच्या पायावर उभी करण्यात रतन टाटा यांनी यश मिळविले. संपूर्ण बाजारपेठेतील नेल्कोचा हिस्सा दोन टक्क्यांवरून वीस टक्के झाला, पण देशात आणीबाणी जाहीर झाली. पाठोपाठ आलेल्या मंदीमध्ये नेल्कोला आपल्या कामगारांच्या मागण्या मान्य करण्यात अपयश आले आणि ही कंपनी बंद पडली. रतन टाटा यांना अनुभवाला आलेले ते पहिले अपयश होते.



१९७७ मध्ये रतन टाटांवर एम्प्रेस मिल या टाटा समूहातील बंद पडावयास आलेल्या मिलची जबाबदारी सोपविण्यात आली. एम्प्रेस मिलच्या यंत्रसामग्रीमध्ये अनेक वर्षांमध्ये गुंतवणूक करण्यात आली नव्हती. कामगारांची संख्याही मोठी आणि त्याच्या तुलनेत उत्पादन तूटपुंजे असे चित्र असलेल्या या मिलमध्ये पन्नास लाख रुपयांची गुंतवणूक करण्याची विनंती रतन टाटा यांनी टाटा उद्योग समूहाला केली, पण नानी पालखीवाला, अजित केरकर आणि रुसी मोदी या संचालकांनी त्याला विरोध केल्याने अखेर ही मिलही बंद करण्यात आली. रतन टाटांच्या नावावर दुसरे अपयश जमा झाले. या सर्व प्रकारामुळे रतन टाटा चांगलेच दुखावले गेले होते, पण त्याचबरोबर अनुभवाच्या शाळेमध्ये बरेच काही शिकले होते. १९८१ मध्ये जे.आर.डी. टाटा यांनी त्यांच्याकडे टाटा इंडस्टीजची सूत्रे सोपविली. त्याच वेळेस ते त्यांचे वारसदार आणि टाटा उद्योगसमूहाचे भावी प्रमुख असणार हे स्पष्ट झाले होते. १९९१ मध्ये जे.आर.डी. यांनी स्वतःच उद्योगसमूहाची सर्व सूत्रे रतन टाटांकडे सोपवून निवृत्ती पत्करली. त्यानंतर सुरू झालेली यशाची मालिका आणि नवे विक्रम अजूनही सुरूच आहेत. कोरस, जग्वार, टेटली आणि लँड रोव्हर सारख्या जगातल्या नामांकित कंपन्या टाटांनी खरेदी केल्या. त्यात २००० मध्ये त्यांनी टाटा टी मिळवून टेटली विकत घेतली आणि जगातील सर्वात मोठी टी बेग्ज बनवणारी कंपनी निर्माण केली. २००४ मध्ये साऊथ कोरिया मधील डेवू कमर्शियल व्हेईकलला रतन टाटा यांनी विकत घेतले. टाटा मोटर्स घेऊन जग्वार लँड रोव्हर विकत घेतली आणि टाटा स्टील घेऊन कोरस कंपनीचे अधिग्रहण केले. २००७ मध्ये टाटा ने लंडनमधील कोरस ग्रुप ही स्टील कंपनी विकत घेतली, नंतर तिचे नाव टाटा स्टिल युरोप ठेवण्यात आले. २००८ मध्ये टाटाने कॉर्नेलला ५० दशलक्ष डॉलर भेट दिले, जे विद्यापीठाच्या इतिहासातील सर्वात मोठे आंतरराष्ट्रीय देणगीदार बनले. याच काळात टाटा समूहाचे तत्कालीन प्रमुख जे.आर.डी. टाटा यांच्याशी त्यांची भेट झाली. त्यांनी मोठ्या प्रमाणावर भारत-केंद्री गटातील टाटा समूहाला जागतिक व्यवसायात रूपांतरित करण्याच्या प्रयत्न केला.

या भरारीनं देशातल्या तरुणांना नवी ऊर्जा दिली. 'मोठी स्वप्न पाहाणं आणि ती प्रत्यक्षात आणणं' हा रतन टाटांचा स्वभाव होता. याच स्वप्नांमधून इंडिगो आणि नॅनोची निर्मिती झाली आणि कुठलीच गोष्ट अशक्य नाही, हे सुध्दा टाटांनी कतृत्वाने सिद्ध करुन दाखविले. हे यश मिळवत असतांना टाटांनी कधीच आपल्या म ुल्यांशी तडजोड केली नाही. यामुळंच सचोटी, गुणवत्ता म्हणजे टाटा हे समीकरण तयार झालंय. निवृत्तीनंतर ते नवउद्योजकांना प्रोत्साहन देत असतांना त्यांना श्वासोच्छवासामुळे गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते आणि ७ ऑक्टोबर २०२४ पासून त्यांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले होते. वय-संबंधित समस्यांमुळे ९ ऑक्टोबर २०२४ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्र सरकार आणि झारखंड सरकारने एक दिवसाचा शोक जाहीर केला. १० ऑक्टोबर रोजी टाटा यांचे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंतिम संस्कारादरम्यान त्यांना लष्करी आणि २१ तोफांची सलामी देण्यात आली. मुंबई पोलिसांनी समारंभपूर्वक 'गार्ड ऑफ ऑनर' दिला आणि त्यांचे पार्थिव भारतीय ध्वजात गुंडाळले गेले.

पद्मविभूषण रतन टाटा यांच्या निधनाने संपूर्ण देश हळहळला. तांत्रिक, औद्योगिक सर्वच क्षेत्रात टाटा समूहाचे नाव अग्रणी आहे. त्यांनी अनेकांना कौशल्य प्रदान करून रोजगार दिलेला आहे तसेच, त्यांचे विविध क्षेत्रांच्या व उद्योगांच्या विकासासाठी दिलेले योगदान हे अतुलनीय आहे, त्यामुळे भारतातील पहिला कौशल्य विद्यापीठास त्यांचे नाव मिळावे ही अतिशय सन्मानाची गोष्ट आहे. त्याचबरोबर नवीन उद्योगांना सुद्धा त्यांनी वेळोवेळी पुढाकार घेऊन सहकार्य केले. ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांच्या स्मृतींचे जतन करण्यासाठी आणि उद्योग क्षेत्रातील या महान विभूतीच्या कार्याला आदरांजली देण्याच्या उद्देशाने नुकतेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठास रतन टाटा यांचे नाव देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. 'पद्मविभूषण रतन टाटा कौशल्य विद्यापीठ' असे या विद्यापीठाचे नाव असेल. या नामकरणामुळे विद्यापीठाच्या माध्यमातून होणाऱ्या तांत्रिक प्रगतीस चालना मिळेल आणि युवकांना रतन टाटा यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विद्यापीठात शिक्षण घेण्याचा अभिमान वाटेल. या विद्यापीठाच्या माध्यमातून उद्योगांना कुशल मनुष्यबळ पुरवणे तसेच नवोदितांच्या संकल्पनांना बळ देण्याचे उद्दिष्ट आहे. हा उद्देश रतन टाटा यांच्या विचारांचा आरसा असून त्याचे आचरण म्हणजेच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली आहे. देशातील एक आदर्श व्यक्तिमत्व, सुप्रसिद्ध उद्योगपती व टाटा समूहाचे अध्यक्ष रतनजी टाटा यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

**- प्रविण बागडे**
**नागपूर ९९२३६२०९१९**

## हमी..

लक्षात आले आत्ता
जनसंपर्क पडे कमी
सर्व सर्वे सांगतात रे
विजयाची नाही हमी

तंबू सोडू जावू लागे
सरदारसारे पराक्रमी
खिंडार पडे बुरुजांस
अफवां पीक विक्रमी

निवडून येऊ कधीही
उतरायला लागे गुर्मी
चर्चा रंगे उलट सुलट
वाढत चालली गरमी

जन संपर्क वाढवू या
स्वभावा आली नरमी
ताठरपणा गळून पडे
मान झुकवली बेशर्मी

धार्मिकअसंतोष माते
स्पोटके पेटवे निधर्मी
जाणीव होते चुकांची
बसू लागता घाव वर्मी

क्लायमॅक्स सनसनाट
कसे करती नाट्यकर्मी
पाया नाही बळ तरीही
उभे रहायची का उर्मी

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## कानगाव शाळेत वाचन प्रेरणा दिन साजरा...

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.१५, दौंड (पुणे) :** कानगाव (तालुका दौंड) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून श्याम ठाणेदार सरांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व विषद केले तर श्री एकनाथ हराळ सरांनी डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचे जीवनचरित्र विद्यार्थ्यांना उलगडून दाखवले. त्यानंतर शाळेतील विद्यार्थी तसेच शिक्षकांनी एकत्र बसून विविध पुस्तकांचे वाचन केले. पुस्तकासोबतच विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रांचेही वाचन केले. पुस्तकांचे वाचन केल्यावर विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांचे समीक्षण केले. शालेय पुस्तकां सोबतच अवांतर पुस्तकांचे आणि वर्तमानपत्राचे दररोज वाचन करण्याचा पण विद्यार्थ्यांनी केला. वाचन प्रेरणा दिनाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक शामराव जगताप, उपशिक्षक राजेंद्र जगताप, सखाराम खोमणे, श्याम ठाणेदार, एकनाथ हराळ, प्रकाश लकडे, संध्या कुंभार, शोभा कोष्टी या शिक्षकांनी प्रयत्न केले.

## भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंतीदिनी पालिकेमार्फत अभिवादन

**अक्षराज : जे. के. पोळ**




**दि.१६, नवी मुंबई :** मिसाईल मॅन म्हणून जगभरात ख्याती असलेले थोर शास्त्रज्ञ, भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात, विलास मलुष्टे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## गुरुजनांचा सन्मान सोहळ्यात शिक्षक अरुण गुप्ता यांचा सन्मान

**अक्षराज : संदीप येवले**




**दि.१६, मुंबई :** निर्मला सामाजिक बहुउद्देशिय संस्थेच्या वतीने पार्क साईट येथील वाणी समाज सभागृह येथे आयोजित करण्यात आलेली गुरुजनांचा सन्मान सोहळ्यात घाटकोपर पश्चिम मधील लिटिल फ्लॉवर इंग्लिश शाळेतील शिक्षक अरुण गुप्ता यांचा सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळ्यात शाळेच्या संचालिका, मुंबई काँग्रेस उपाध्यक्ष जेनेट डीसूझा, मुंबई शिक्षक आमदार ज. मो. अभ्यंकर, कोकण विभागाचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, राष्ट्रवादी मुंबई प्रदेश युवक अध्यक्ष डॉ.अमोल मातेले, कार्यक्रमाचे अध्यक्ष आलम खान, महापालिका माध्यमिक शालाचे मुख्याध्यापक अंबरसिंग मगर आदी उपस्थित होते. गुरू आणि शिष्यांच एक अतूट नात आहे. गुरूच्या मार्गदर्शनाखाली शिष्य परंपरा अखंड सुरू आहे. शिष्याला मिळणाऱ्या यशात गुरूंचा मोठा वाटा असतो आणि त्याचे ऋणी म्हणून आम्ही गुरुजनांचा सन्मान या कार्यक्रमात लिटिल फ्लॉवर इंग्लिश शाळेचे शिक्षक अरुण गुप्ता यांचा सन्मान केल्याचे अध्यक्ष आलम खान म्हणाले.

## प्रकाश हायस्कूल, ज्युनियर कॉलेज येथील विद्यार्थ्यांना दिवाळी स्नेहभेट

**अक्षराज : दिवाकर घेर**




**दि.१६, नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील मनसर (कान्द्री-माईन) येथील प्रकाश हायस्कूल व ज्युनियर कॉलेज कान्द्री-माईन येथे आज जागतिक अन्न दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना रोटी फाऊंडेशन मुबंई च्या वतीने दिवाळी स्नेहभेट देण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या सर्वागीण विकासासाठी मदतीचा हात पुढे करण्यात रोटी फाऊंडेशन मुंबई कार्यरत आहे. सेवानिवृत्त पोलीस महासंचालक डी. शिवानंद यांच्याद्वारे संचालीत रोटी फाऊंडेशन मुंबई नागपूर जिल्ह्य़ात विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत आहे. आज (ता १६) जागतिक अन्न दिनानिमित्त प्रकाश हायस्कूल व ज्युनियर कॉलेज कान्द्री-माईन शाळेत झालेल्या कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांना समोसा, केळी, मिठाई व चिक्की या साहित्याचे वाटप करण्यात आले. मुंबई येथील प्रसिद्ध उद्योजक व रोटी फाऊंडेशनचे समन्वयक सी.एम.बगडीया यांच्या सहकार्याने व संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई येथील प्रसिद्ध उद्योजक व रोटी फाऊंडेशन मुंबई चे समन्वयक सी.एम.बगडीया, ओबीसी चळवळीचे शिलेदार व रोटी फाऊंडेशन मुंबईचे समन्वयक संजय पन्नासे, मुख्याध्यापक मिलिंद वानखेडे, मॉयलचे कर्मिक अधिकारी डॉ.अमितकुमार सिंह उपस्थित होते. शालेय विद्यार्थ्यांना शालेय वयातच मदतीचा व प्रेमाचा हात हवा असतो. हा हात योग्य वेळी मिळाल्यास विद्यार्थ्यांचा मानसिक, शारीरिक व बौद्धिक विकास परिपक्व होत असल्याचे मत कार्यक्रमाचे आयोजक मुख्याध्यापक मिलिंद वानखेडे यांनी व्यक्त केले.

तसेच कार्मिक अधिकारी डॉ.अमितेश कुमार सिंह यानी जागतिक अन्न दिनानिमित्त विद्यार्थ्यांनकडून शपथ घेतली. कार्यक्रमाचे संचालन कामिनी पाटील यांनी केले तर उपस्थितांचे आभार विजय लांडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सर्व शिक्षकवृंद यांनी सहकार्य केले.

# देसाई कारखान्याने शेतकऱ्यांची थकीत रक्कम व व्याज दिवाळीपूर्वी अदा करावी

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१६, पाटण :** सातारा जिल्ह्यातील इतर कारखान्यांच्या तुलनेत लोकनेते बाळासाहेब देसाई सह. कारखान्याने शेतकऱ्यांना ३०० ते ५०० रुपये कमी दर दिला असताना देखील जाहीर केलेल्या २८५० रुपये रक्कमेतील ५० रुपये कमी देऊन शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. २० ऑक्टोबर पर्यंत मागील जाहीर केलेली रक्कम व त्यावरील व्याज शेतकऱ्यांना अदा करावी असे सक्त निर्देश देसाई कारखान्याला जिल्हाधिकारी जितेंद्र डुड्डी यांनी दिले आहेत. दिवाळी पूर्वी शेतकऱ्यांची थकीत ठेवलेली रक्कम व त्यावरील व्याज शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केली नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पायरीवर बसून आंदोलन करणार असल्याचे किसान मंच शेतकरी संघटनेचे पाटण तालुका अध्यक्ष प्रशांत पाटील यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

प्रशांत पाटील यांनी पत्रकात पुढे म्हणले आहे. दि. ७ आक्टोबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी जितेंद्र डुड्डी यांनी चालु होणाऱ्या ऊस गळीत हंगाम व ऊस दराचे प्रश्नांवर



सामंजस्याने मार्ग काढण्याचे उद्देशाने साखर कारखान्याचे व शेतकऱ्यांचे प्रतिनिधी यांच्या संयुक्त बैठकीचे नियोजन जिल्हाधिकारी कार्यालयात केले होते. बैठकीच्या सुरवातीलाच जिल्हाधिकारी जितेंद्र डुड्डी यांनी मागील बैठकीचा आठावा घेतला. या मध्ये बहुतांश साखर कारखान्यांनी गत वर्षी गाळपास आलेल्या ऊसाची एफ आर पी एक रक्कमी आदा केलेचे निदर्शनास आणून दिले असताना गत बैठकीत जाहीर केले प्रमाने एक दोन कारखाने वगळता सर्वच कारखान्यांनी ३००० ते ३१५० चे आसपास दर दिलेला आहे.

या वेळी पाटण तालुक्यातील लो. बाळासाहेब देसाई सह. साखर कारखान्याची एफआरपी २८५० रुपये होती. ही रक्कम शेतकऱ्यांना तीन तुकड्यात दिली आहे. व मागील बैठकीत २८५० रुपये दर जाहीर केला असताना प्रत्यक्षात २८०० रुपयेच आदा केलेले आहेत. दिवाळी पूर्वी थकीत एफआरपी वरील व्याज व बाकी असनारे ५० रुपये दिवाळी पुर्वी दिलीच पाहीजे आशी आग्रही भुमीका शेतकरी संघटना किसान मंच चे पाटण तालुका अध्यक्ष प्रशांत पाटील यांनी घेतली. या वेळी सदर रक्कम देण्यास कारखान्याचे अधिकाऱ्यांनी असमर्थता दाखवली.

यावेळी पाटील यांनी अक्रमक भुमीका घेत कारखाना प्रशासनाचे अडमुटे भुमीकेचा निषेध करत जिल्ह्यातील ईतर कारखान्यात या कारखान्याचे तुलनेत दर वर्षी ३०० ते ५०० रुपये कमीच असतात या वेळेस मात्र ठरलेली रक्कम २८५० रुपये थकीत ठेवलेले ५० रुपये व यावरील व्याज घेतले शिवाय आम्ही शांत राहणार नाही आशी आक्रमक भुमीका घेत वेळप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पायरीवर बसून आंदोलन करु असा इशारा देताना जिल्ह्यातील सर्व कारखान्यांनी या वर्षीचा दर हा हंगाम चालु करण्यापुर्वीच जाहीर करावा. ऊस तोडणी कार्यक्रम हा कार्यक्षेत्रातील प्रत्येक ग्रमपंचायतीत प्रसिद्ध करावी अशी मागणी केली.

यावेळी मात्र जिल्हाधिकारी यांनी ठरलेली रक्कम व व्याज हे २० आक्टोबर पर्यंत चुकते करण्याचे निर्देश दिले व या हंगामातील दरा संदर्भात दि २१ आकटोबर रोजी पुन्हा बैठक घेन्याचे जाहीर केले. या बैठकीस साखर आयुक्त कार्यालय पोलीस प्रशासनातील तसेच वजण काटा निरीक्षक कार्यालयातील अधीकारी सर्व संघटणांचे प्रतीनिधी पाटण तालुक्यातुन प्रभाकर देसाई, चंद्रकांत यादव आदीं उपस्थित होते.

**जिल्हाधिकारी जितेंद्र डुड्डी यांची शेतकऱ्यांना न्याय देण्याची भूमिका - प्रशांत पाटील**

जिल्हाधिकारी यांची भुमीका निश्चितच शेतकऱ्यांना न्याय देन्याची आहे. यावर्षी ऊसदर हंगाम सुरू होण्या आगोदरच जाहीर होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपले नुकसान न करुण घेता ऊस पुरवठा करताना योग्य निर्णय घ्यावा आम्ही शेतकऱ्यांचे पाठीशी खंबिर पणे उभे आहोत असे आवाहन पाटील यांनी केले.

# ॥ नवान्न, मोठी आंबील व दूध : अवर्णनीय स्वाद ॥

**(कोजागिरी आणि नवान्न पौर्णिमा विशेष.)**

कोजागिरी म्हणजेच हूजरे गिरी म्हणत कोजागिरी पौर्णिमेच्या रात्री जागरण करून मस्त बेत आखला जातो. इतकीच या दिवसाची ओळख आपल्याला आहे. मस्त मसाला दूध, सोबत रास गरबा असा आनंद तुम्ही देखील नक्कीच घेतला असेल. पण कोजागिरी पौर्णिमेचे हिंदू धर्मात फार मोठे महत्व आहे. अश्विन पौर्णिमेला येणारा सण असून हा सप्टेंबर ते ऑक्टोबरमध्ये येतो. दसऱ्यानंतर येणाऱ्या पौर्णिमेला हा दिवस साजरा केला जातो. हिंदू धर्माप्रमाणे बौद्ध धम्म ातही या दिवसाला महत्व आहे. इतकेच नाही तर शेतकऱ्यांसाठीही दुसरा दिवस महत्वाचा आहे. कोजागिरी पौर्णिमा ही वेगवेगळ्या नावाने ओळखली जाते. याला शरद पौर्णिमा, मणिकेथारी, नवान्न पौर्णिमा, कौमुदी पौर्णिमा, माडी पौर्णिमा असे देखील म्हणतात. कोजागिरी पौर्णिमेच्या शुभेच्छा देऊन हा दिवस साजरा करू शकतो.

कोजागिरी पौर्णिमा साजरी का केली जाते? हा प्रश्न पडणे अगदी स्वाभाविक आहे. कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी चंद्र पृथ्वीच्या जवळ आलेला असतो. त्यामुळे चंद्राचे चांदणे हे पृथ्वीवर जास्त पडते. हे चांदणे अधिक शुद्ध आणि सात्विक असल्याचे म्हटले जाते.खगोल शास्त्रीयदृष्ट्या या दिवसाला फारच महत्व दिले जाते. प्राचीन आणि पौराणिक काळाचा विचार करता या दिवसाला खुपच महत्व आहे. कोजागिरी पौर्णिमेच्या आधी नऊ दिवसाची नवरात्र आलेली असते. या नऊ दिवसात शक्ति आणि बुद्धीची देवता पार्वती व तिच्या



वेगवगेळ्या रुपांची आपण मनोभावे पूजा करतो. विजयादशमी अर्थात दसरा या दिवशी विजय संपादनासाठी विजयादशमी साजरी केली जाते. याला सीमोल्लंघन देखील म्हणतात. त्यानंतर येणाऱ्या या पौर्णिमेपर्यंत शेतीची कामे देखील अर्ध्यावर आलेली असतात. पावसाळा संपून नवी पिके हाताशी आलेली असतात. त्यामुळे शेतकरी बांधव नवे खाण्याचाही आनंद- नवान्न पौर्णिमा या दिवशी साजरा करत असतो. कोजागिरी पौर्णिमेबद्दलच्या अनेकांच्या वगवेगळ्या धारणा आहेत. आरोग्याच्या दृष्टिकोनातूनही याचे एक वेगळे महत्व आहे. दमा आणि अस्थमा असणाऱ्यांसाठीही आजचा दिवस फारच महत्वाचा आहे. दमा असणाऱ्यांनी त्यांच्या औषधाचा डोस कोजागिरी पौर्णिमेसाठी तयार केलेल्या दुधात घालावा आणि ते दूध चंद्राच्या प्रकाशात ठेवावे. मग दूध प्यावे. या दुधामधील गुणधर्म हे चंद्रप्रकाशामुळे बदलते. ज्याचा फायदा आम्हाला होतो. थंडीला या काळात सुरुवात होऊ लागते. त्यामुळे गरम दुधात सुकामेवा घातला जातो. असे दूध प्यायल्याने शरीरात उष्णता टिकून राहते.

कोजागिरी पौर्णिमा ही दसऱ्यानंतर येणाऱ्या पौर्णिमेच्या दिवशी साजरी केली जाते. पूर्ण चंद्र वर आल्यानंतर चंद्रासमोर मसाला दूध ठेवून त्याचे सेवन केले जाते. लक्ष्मी पृथ्वीतलावर येणार याचे स्वागत करण्यासाठी जागे राहण्याची फार पूर्वीपासूनची परंपरा आहे. कोजागिरी पौर्णिमेसंदर्भात अनेक कथा सांगितल्या जातात. यापैकी काही कथा जाणू घेऊया. त्यामुळे कोजाागिरी पौर्णिमेचे महत्व कळेल. एका राजाची कथा यामध्ये सांगितली जाते. एक राजा काही कारणामुळे आपले सगळे वैभव आणि संपत्ती गमावून बसतो. आपली संपत्ती पुन्हा मिळवण्यासाठी राणीने महालक्ष्मीचे व्रत केले. तिच्या व्रतामुळे लक्ष्मी देवी प्रसन्न झाली आणि तिला आशीर्वाद मागण्यास सांगितले. तिने आपले राजवैभव परत मागितले. तिला ते वैभव परत मिळाले. कोजागिरी पौर्णिमेच्या या दिवशी मध्यरात्री चंद्रमंडलातून उतरून साक्षात महालक्ष्मी खाली पृथ्वीतलावर येते. ती चांदण्यांच्या प्रकाशात अमृतकलश घेऊन येते आणि सगळ्यांना विचारते, को जागर्ति, को जागर्ति? तिने आणलेल्या अमृत कलशामध्ये असलेले ज्ञान, वैभव देण्यासाठीच ती आलेली असते. जे लक्ष्मीला साद देतात, त्यांना ही सुखसमृद्धी मिळते, अशी समजूत आहे. या दिवशी देवी महालक्ष्मीची पूजा करण्याची खुप ठिकाणी पद्धत आहे. यासाठी स्वच्छ स्नान करतात, उपवास ठेवतात. तांब्याच्या, चांदीच्या किंवा मातीच्या कलशावर वस्त्राने झाकलेली लक्ष्मीची मूर्ती स्थापित करून मनोभावे पूजा करतात. चंद्रोदय झाल्यावर तूपाचे दिवे लावतात. दूध, तूप आणि ड्रायफ्रुट्स घालून खीर वा मोठी आंबील बनवली जाते. ती चंद्रप्रकाशात ठेवतात. त्यानंतर अशी खीर प्रसाद म्हणून वाटतात आणि स्वतःही ग्रहण करतात. कोजागिरीच्या दिवशी घरातील ज्येष्ठ अपत्याला ओवाळून अश्विनी साजरी केली जाते. घरी मस्त मसाला दूध बनवले जाते. सुका मेव्यात आटवलेले गोड दूध चंद्रप्रकाशात न्हाऊन काढले जाते. मग ते प्राशन केले जाते. मंगलमय गाणी, रास गरबा, भजन, कीर्तन करून ही रात्र जागून काढली जाते. या सणानिमित्त समाजातील इतर लोकही सहभागी होतात; त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता दृढ होण्यास मदत होते. आपापसात बंधुत्वाचे संबंध प्रस्थापित करून प्रेम व आनंदाने साजरा केला जाणारा सण अशी त्याची ओळख आहे. नव्या अन्नाच्या स्वरूपात दान केले जाते. भारतीय लोक हा सण मोठ्या आनंदाने व श्रद्धा-भक्तिभावाने साजरा करतात.

**!! शारदीय पौर्णिमेतील या सणांच्या अमृततुल्य हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

**- संकलन व शब्दांकन -**
**श्री.कृष्णकुमार निकोडे गुरुजी.**
**रामनगर, गडचिरोली,**
**फक्त व्हॉटसॅप- ९४२३७१४८८३**

## महात्मा बसवेश्वर महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी महेश हंडे यांचे साकडे

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१६, नांदेड :** गेल्या काही वर्षा पासून अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना यांच्यामार्फत बिलोली शहरात जगत ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारला जावा. यासाठी समाज बांधवांनी मागणी करीत आहेत. याबाबत अनेक नेत्यांनी निव्वळ धूळ फेक करून समाज बांधवांना झूलवित ठेवून केवळ मतांचा उपयोग करून घेतला आहे. अशी भावना समाज बांधवाची झालेली आहे. अशात या समाजाला सध्या समाजाचा एक कणखर खासदार म्हणून अजित गोपछडे यांच्या रूपाने मिळाल्यामुळे सध्या पुन्हा एकदा ही मागणी तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष महेश पाटील हंडे यांच्या पुढाकारातुन सर्व समाज बांधवांनी केली आहे.

यासाठी खासदार डॉ.अजित गोपछडे, प्रा.मनोहरराव धोंडे संचालक राष्ट्रीय अध्यक्ष यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. समाजाच्या भावना लक्षात घेऊन मागणी पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. नुकतेच बिलोली तालुक्यात खासदार अजित गोपछडे काही गावांना भेटी दिल्या. या दरम्यान नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. याच वेळी गावातील काही नागरीकांनी विकास कमाची मागणी केली. लगेच गोपछडे यांनी केलेल्या मागणी प्रमाणे निधी देऊन समस्या दुर करण्याचा प्रयत्न केला. यावेळी सरपंच संघटनेचे अध्यक्ष महेश पाटील हंडे यांच्यासह तालुक्यातील भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, सरपंच संघटनेचे पदाधिकारी गावकरी उपस्थित होते.

## भाजपाचे सदभावना सामाजिक विशेष संपर्क अभियान सुरु

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१६, नांदेड :** भारतीय जनता पार्टीचे नांदेड उत्तर जिल्ह्याचे महामंत्री प्रवीण गायकवाड यांच्यावर सदभावना विशेष संपर्क अभियानाच्या जिल्हा संयोजक पदाचा अतिरिक्त भार प्रदेश भाजपाने सोपविला आहे.

सविस्तर वृत्त असे की, सद्या मराठवाड्यात सामाजिक वातावरण राजकीय दृष्ट्या दूषित झाले असून त्याचा फेक नरेंटिव्ह पसरून लोकसभा निवडणुकीत भाजपाला मोठी राजकीय किंमत मोजावी लागली होती, ही बाब लक्षात घेऊन सूक्ष्म मागास संघटन बांधणीच्या दृष्टीने भाजपाने आपला राजकीय मोर्चा वळवीला आहे. या अभियानात भाजपाचे प्रत्येक विधानसभा निहाय्य प्रमुख कार्यकर्ते वेगवेगळ्या समाजाच्या भेटी घेऊन पक्षाचे ध्येय धोरणे आणि समाज उपयोगी सरकारी योजनांची आठवण बुथ पातळी पर्यंत करून देणार आहेत.

अशा महत्वपूर्ण अभियानाच्या नांदेड उत्तर जिल्ह्यांची प्रमुख जबाबदारी भाजपातील अडीच दशकाचा प्रदीर्घ असा संघटनात्मक अनुभव असलेले प्रवीण गायकवाड यांच्याकडे सोपविली आहे. या अभियान प्रमुखांच्या संपूर्ण मराठवाड्याच्या निवडी प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे यांनी घोषित केल्या असून, नांदेड दक्षिण जिल्हा संयोजक पदी दिवंगत माजी आ.गंगारामजी ठक्करवाड, नांदेड महानगर जिल्हा अमोल कदम, यांच्यावर गोषित जबाबदारी देण्यात आल्याचे भाजपा प्रदेश सचिव बंजारा क्रांतिद लाचे संस्थापकीय अध्यक्ष देविदास राठोड यांनी कळविले आहे.

# मतदान केंद्रांवर किमान आवश्यक सुविधा मतदारांसाठी उपलब्ध राहतील - निवडणूक निर्णय अधिकारी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, कल्याण (ठाणे) :** सार्वत्रिक विधानसभा निवडणूका २०२४ च्या पार्श्वभूमीवर आज १४४-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघ कार्यालयात १४४-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांचे अध्यक्षतेखाली राजकीय पदाधिकारी/प्रतिनिधी समवेत बैठक संपन्न झाली. मतदान केंद्रांवर किमान आवश्यक सुविधा मतदारांसाठी उपलब्ध राहतील, अशी ग्वाही १४४-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांनी या बैठकीत उपस्थित राजकीय पक्षांच्या पदाधिकारी/प्रतिनिधींना दिली.

दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीची आदार्श आचार संहिता लागू झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत बॅनर्स, पोस्टर्स व कट ऑऊटस् इ. काढण्याचे काम सुरु आहे , राजकीय पक्षांनी आपले बॅनर्स, पोस्टर्स व कट ऑऊटस् इ. काढण्यास सहकार्य केल्यास, शासकीय यंत्रणेवर ताण येणार नाही, असेही ते पुढे म्हणाले. त्याचप्रमाणे राजकीय पक्षांच्या कार्यालयाबाहेर पदाधिकारी यांचे छायाचित्र असल्यास त्याची देखील रीतसर परवानगी घ्यावी, अशा सूचना त्यांनी या बैठकीत दिल्या.



नामनिर्देशन अर्ज हे निशुल्क उपलब्ध राहणार असून १ उमेदवार ४ अर्ज भरु शकतो तसेच १ उमेदवार २ विधानसभा मतदार संघात आपले अर्ज दाखल करु शकतो. सभा, रॅली इ.साठी आवश्यक सर्व परवानग्या (पोलीस, आरटीओ, ट्राफीक, मनपा) या एक खिडकी योजनेद्वारे राजकीय पक्षांना निवडणूक कार्यालयात उपलब्ध होतील.

१४४-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघात मूळ ४३३ मतदान केंद्रे असून १ सहाय्यकारी (ऑक्झीलरी) मतदान केंद्र प्रस्तावित आहे, अशीही माहिती १४४-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांनी या बैठकीत दिली आणि सर्व राजकीय पक्षांनी निवडणूकीकामी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

बैठकीस उपस्थित असलेल्या राजकीय पक्षांच्या पदाधिकारी/प्रतिनिधींनी देखील निवडणूकीसाठी शासनातर्फे करण्यात येणा-या विविध उपाय योजनांबाबत यावेळी समाधान व्यक्त केले.

# निवडणुकीतील प्रत्येक टप्प्याची काळजीपूर्वक कार्यवाही करावी - जिल्हाधिकारी कटियार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, अमरावती :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक एकाच टप्प्यात होणार असल्याने सर्व मतदारसंघांत एकाचवेळी कार्यवाही करावी लागणार आहे. प्रामुख्याने उमेदवारी अर्ज, मतदान आणि मतमोजणी या निवडणुकीच्या टप्प्यावर सर्व यंत्रणांनी काळजीपूर्वक कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आगामी विधानसभा निवडणुकीबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसिलदार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले, गेल्या निवडणुकीमधील त्रृटी यावेळी होणार नाही, याची दक्षता घ्यावी. या त्रृटी दूर करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अधिक लक्ष द्यावे. प्रामुख्याने एकूण मतदानाच्या आकडेवारीमध्ये विसंगती दिसून येते. त्यामुळे मतदान पथकाला सदर मतदानाची एकूण संख्या कळविताना अचूक कळविण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच डाटा तयार करताना अचूक आकडेवारी देण्यासाठी जबाबदार पथक नेमण्यात यावे. ही आकडेवारी परत तपासून पहावी.



यावेळी निवडणूक आदेशासोबत टपाली मतपत्रिका राहणार आहे. त्यामुळे आयोगाच्या निर्देशाप्रमाणे कर्तव्यावरील अधिकारी, कर्मचारी यांना टपाली मतपत्रिका उपलब्ध करून देण्यात याव्यात. दिव्यांग आणि ८५ वर्षे वयाच्या नागरिकांना घरून मतदानाचा पर्याय दिला आहे. त्यामुळे सर्व नागरिकांना टपाली मतपत्रिका उपलब्ध व्हाव्यात, यासाठी प्रयत्न करण्यात यावे.

नागरिकांकडून मतदारयादीत नाव नसल्याच्या तक्रारी येतात. त्यामुळे सध्यास्थितीत नाव नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती देण्यात यावी. तसेच नाव नोंदणीसाठी आलेले अर्ज तातडीने निकाली काढण्यात यावे. अर्जाबाबत शंका असल्यास बीएलओमार्फत स्थळ पाहणी करून याबाबत निर्णय घेण्यात यावा. मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी मतदान चिठ्ठी पोहोचविणे महत्वाचे आहे. त्यामुळे सर्व मतदारांपर्यंत मतदार चिठ्ठी देण्यात यावी. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध सामाजिक संस्थांचा सहभाग घेण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी यांनी दिले.

# निर्भय व निष्पक्ष निवडणुकांसाठी आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करा - जिल्हाधिकारी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, छत्रपती संभाजीनगर :** विधानसभा २०२४ चा निवडणूक कार्यक्रम घोषित झाला असून निवडणूका निर्भय व निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करा, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.




विधानसभा निवडणूक २०२४ कार्यक्रम जाहीर होताच प्रशासन सज्ज झाले असून यासंदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी, कार्यालय प्रमुखांच्या बैठका घेऊन त्यांना निर्देश देण्यात आले.

जिल्हा नियोजन सभागृहात पार पडलेल्या या बैठकीस मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस आयुक्त किरण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, निवडणूक उपजिल्हाधिकारी देवेंद्र कटके, मनपा अपर आयुक्त रणजीत पाटील, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुनिल भोकरे, पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी, पोलीस अधीक्षक सुनिल लांजेवार तसेच सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी आदी उपस्थित होते.

बैठकीत आदर्श आचार संहितेच्या अनुषंगाने माहिती देण्यात आली. त्यात आचारसंहिता अंमलात आल्यापासून अनुक्रमे २४, ४८ व ७२ तासात करावयाच्या कार्यवाहीबाबत माहिती देण्यात आली. त्यानुसार,

**४८ तासात करावयाची कार्यवाही**

सर्वच केंद्र शासनाचे व राज्य शासकीय,स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मालकीचे, सार्वजनिक ठिकाणांवरील, मालमत्तेवरील, भुखंड, इमारती, जागा, संरक्षक भिंती मैदाने व इतर सर्व सार्वजनिक ठिकाणांवरील, रुग्णालये, दवाखाने, हॉल्स, प्रेक्षागृहे, नाट्यगृहे, परिसर, पुल, उड्डाणपुल, विद्युत खांब, टेलिफोनचे खांब, बस, रेल्वे, विमाने, हेलिकॉप्टर, सर्व निमशासकीय वाहने, रुग्णवाहीका २ इत्यादीवरील राजकीय पक्ष, आजी-माजी राजकीय पदाधिकारी, आजी-माजी आमदार, मा.खासदार, मा.मंत्री महोदय, राजकीय व्यक्ती इत्यादी राजकीय पदाधिकारी यांचे उभारलेले, स्थापित केलेले, प्रदर्शित केलेले नामफलके, कोनशिला, उद्घाटन फलके, झेंडे, उद्घाटन शिला व इतर तत्सम प्रचार साहित्य, जाहीराती निदर्शनास येऊ नये यासाठी त्यांचे विरुपण (वशषरलशाशपीं) करणे, झाकणे, आवेष्टीत करणे.

**७२ तासात करावयाची कार्यवाही**

सर्व खासगी ठिकाणांवरील, मालमत्तेवरील, भुखंड, घरे, कार्यालये, इमारती, दुकाने, संरक्षक भिंती, आस्थापना व सर्वच खाजगी ठिकाणे, रुग्णालये, दवाखाने, हॉल्स, प्रेक्षागृहे, नाट्यगृहे, सर्व खाजगी वाहने, बस, रेल्वे, विमाने, हेलिकॉप्टर, रुग्णवाहीका इत्यादी राजकीय पक्ष, आजी-माजी राजकीय पदाधिकारी, आजी माजी आमदार, खासदार, मंत्री, राजकीय व्यक्ती इत्यादी राजकीय पदाधिकारी यांचे उभारलेले, स्थापित केलेले, प्रदर्शित केलेले नामफलके, कोनशिला, उद्घाटन फलके, झेंडे, उद्घाटन शिला व इतर तत्सम प्रचार साहित्य निदर्शनास येऊ नये. यासाठी त्यांचे विरुपण (वशषरलशाशपीं) करणे, झाकणे, आवेष्टीत करणे. उपरोक्त नमूद कार्यवाही करण्यासाठीची वरील प्रमाणे नमूद ठिकाणांची निश्चिती आपले अधिनस्थ यंत्रणेमार्फत तात्काळ करण्यात यावी.

तसेच विषयांकीत निवडणूकीची आदर्श आचारसंहिता लागू होताच वरील नमूद प्रमाणे तसेच पत्रात नमूद निर्देशांनुसार आचारसंहिता अंमलबजावणीच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, अशी माहिती देण्यात आली.

मनपा आयुक्त श्रीकांत यांनी सांगितले की, महानगरपालिका हद्दीत असलेल्या विधानसभा मतदारसंघात आचारसंहिता अंमलबजावणी, मतदार जनजागृती, मतदारांना मतदान केंद्रावर द्यावयाच्या सुविधांबाबत पुर्तता करण्यात मनपा प्रशासन सक्रियतेने कामकाज करीत असून यासंदर्भात निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन केले जाईल.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना म्हणाले की, निवडणूक प्रक्रिया कालावधी पाहता सर्व आवश्यक पूर्वतयारी करुन सर्व यंत्रणांनी सज्ज राहणे आवश्यक आहे. मतदारांना निर्भय आणि निष्पक्ष वातावरणात आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी आचारसंहिता अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, सर्व विभागांनी आपापसात समन्वय व संवाद राखून आचारसंहिता अंमलबजावणीची व निवडणूक प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण करावी. विधानसभा मतदारसंघनिहाय या सर्व कार्यवाहीसाठी सर्व यंत्रणांना समन्वय असणे आवश्यक आहे. सर्व नियमांची माहिती व अभ्यास करणे आवश्यक आहे. जिल्हास्तरावरुन आवश्यकतेनुसार मार्गदर्शन सुविधा ही उपलब्ध असेल असेही त्यांनी सांगितले.

**विधानसभा निवडणूक कार्यक्रम**

मंगळवार, दि. २२ ऑक्टोंबर रोजी निवडणूक अधिसूचना प्रसिद्धी,

मंगळवार, दि.२९ ऑक्टोंबर रोजी नामनिर्देशन सादर करण्याचा अंतिम दिनांक,

बुधवार, दि.३० ऑक्टोंबर रोजी नामनिर्देशपत्र छाननी,

सोमवार, दि.४ नोव्हेंबर रोजी नामनिर्देशन पत्र माघारी घेण्याची अंतिम मुदत पर्यंत असेल बुधवार, दि.२० नोव्हेंबर रोजी मतदान,

शनिवार, दि.२३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी

सोमवार, दि.२५ नोव्हेंबर रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण.

# थोडक्यात

## अनुदानित आश्रमशाळा जळोद येथे वाचन प्रेरणा दिवस उत्साहात साजरा

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.१५, शिरपूर :** दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी आमच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा जळोद येथे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक पी.एन मराठे व ए.जी पवार यांच्या हस्ते डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे फुलहार अर्पण करून पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्राथमिक शिक्षक एन.जी मराठे यांनी वाचन प्रेरणा दिवसाचे व वाचनाचे महत्त्व व स्वच्छ हात धुवा मोहीम याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात विद्यालयातील इयत्ता पहिली ते अकरावीचे सर्व विद्यार्थी सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी शालेय पटांगणावर एक तास वाचन केले तसेच प्राथमिक शिक्षक एस.एस मोरे यांनी स्वच्छ हात धुण्याची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष करून दाखवली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय सांस्कृतिक समिती व शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर बंधू भगिनी यांनी मोलाचे सहकार्य केले.

## दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'परीक्षेची पूर्वतयारी' विषयावर चर्चासत्र



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१६, पंढरपूर :** दहावीचे वर्ष विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे असते कारण ते शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रवासाची दिशा ठरवते रोटरी क्लब ऑफ माढा व एमआयटी ज्युनिअर कॉलेज वाखरी पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने माढा परिसरातील इयत्ता दहावी च्या मुलांसाठी परिक्षेची पूर्व तयारी या विषयावर चर्चा सत्र पार पडले. यामध्ये बीजगणित भूमिती विषय तज्ञ बडवे एन बी, भंडारकवठेकर एन व्ही, इंग्रजी विषय तज्ञ कुलकर्णी एस एम, विज्ञान व तंत्रज्ञान विषय तज्ञ कंगळे वाय.के. यांचे मार्गदर्शन लाभले. यामध्ये मान्यवर तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना विविध समस्यांवर मार्गदर्शन केले.यामध्ये अभ्यासाचे नियोजन कसे करावे? वेळापत्रक तयार करणे, दररोज कोणत्या विषयाला किती वेळ द्यायचा, महत्वाच्या विषयांना प्राधान्य देणे, नियमित अभ्यासाची सवय लावने, रोजचे विषय आणि गृहपाठ पूर्ण करने, नोट्स बनवणे, मागील वर्षांचे प्रश्नपत्रिका सोडवणे, आवड, क्षमता आणि भविष्यातील करियर योजना विचारात घेणे, इंजिनीअरिंग, मेडिकल किंवा इतर व्यावसायिक अभ्यासक्रम करायचा असेल, तर प्रवेश परीक्षा आणि त्यांची तयारी याबद्दल माहिती घेणे, योगा, ध्यान किंवा खेळ यासारख्या तणाव निवारक तंत्रांचा अवलंब करने, स्वतःवर विश्वास ठेवने, नेहमी सकारात्मक विचार करने, आपण यशस्वी होऊ शकतो.

यावर विश्वास ठेवने, मॉडेल प्रश्नपत्रिका सोडविणे, विज्ञान, वाणिज्य, कला या शाखांमधील विविध करिअरच्या संधींबद्दल माहिती घेणे, चांगला आहार, पुरेशी झोप, आणि व्यायाम यावर भर देणे, शारीरिक आणि मानसिक आरोग्य राखणे, या व अशा अनेक विषयांवर सखोल मार्गदर्शन मिळाले.या चर्चा सत्रासाठी रोटरी क्लब ऑफ माढा चे अध्यक्ष सोमेश्वर तोंगळे, सचिव, सुभाष पाटील, एमआयटी ज्युनिअर कॉलेज वाखरी चे प्राचार्य डॉ स्वप्नील शेठ, मार्केटिंगचे तानाजी डूबल सर यांनी परिश्रम घेतले.

## ४०० शाळांमध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१५, नवी मुंबई :** भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी स्मृतींना वंदन करत शासन परिपत्रकान्वये त्यांचा जयंतीदिन हा वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मुलांमध्ये वाचनाची आवड जोपासली जावी व अवांतर वाचनाची प्रेरणा निर्माण व्हावी, यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांसह पालिका क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या ४२९ शाळा महाविद्यालयांमध्ये वाचन प्रेरणा दिनानिमित्त वाचन संस्कृतीची जपणूक करणारे विविध कार्यक्रम आयोजित करण्याबाबत नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार नवी मुंबई महानगर पालिकेच्या शिक्षण विभागामार्फत सूचित करण्यात आले होते. त्यानुसार भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करत विविध शाळांमध्ये वेगवेगळया प्रकारचे उपक्रम उत्साहाने राबविण्यात आले. या अंतर्गत काही शाळांमध्ये विविध लेखकांची पुस्तके, कथासंग्रह, कविता संग्रह विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करुन देण्यात आले होते.

विद्यार्थ्यांची आकलनशक्ती वाढविण्याच्या दृष्टीने काही शाळांमध्ये पुस्तकांमधील काही भागांचे जाहीर वाचन करुन त्यावर आधारित प्रश्न विचारण्यात आले व विद्यार्थ्यांना त्याची उत्तरे विचारुन माहिती संग्रहण व त्याचे सादरीकरण असा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. त्याचप्रमाणे साहित्यावर आधारित व्याख्याने व स्पर्धांचेही आयोजन काही शाळांनी केले. या उपक्रमांमध्ये काही शाळांनी शिक्षक, विद्यार्थी यांच्याप्रमाणेच पालकांनाही सहभागी करुन घेतले. त्याचप्रमाणे पुस्तकातील काही भागांच्या चक्री अभिवाचनाचा अभिनव प्रयोग ही काही शाळांनी राबविला. वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी व त्यांनी जीवन समृध्द करणाऱ्या पुस्तकांशी मैत्री करावी या दृष्टीने या विविध उपक्रमाच्या माध्यमांतून वाचनप्रेमाची रुजवात करण्यात आली. स्मार्टफोन, संगणक यांचा गरजेपुरता वापर करावा असेही सूचित करण्यात आले. वाचन प्रेरणा दिन हा एका दिवसापुरता मर्यादित न राहता या दिनापासून वाचनाची सुरुवात करावी आणि दररोज काही ना काही अवांतर वाचन करावे हा विचार विद्यार्थ्यांच्या मनावर संस्कारित करण्यात आला. नवी मुंबईतील ४०० हून अधिक शाळा आणि महाविद्यालयातील २ लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा आदर्श नजरेसमोर ठेवून त्यांचा जयंती दिवस अर्थात वाचन प्रेरणा दिन स्मृतींना वंदन करीत त्यांच्या पुस्तकांचे व इतर पुस्तकांचे वाचन करीत उत्साहाने साजरा केला.